## निशाण क्र. ९ वरील आदेश

वादी यांनी प्रस्तूतचा अर्ज अंतरीम मासिक निर्वाह भत्ता प्रत्येकी रुपये १०,०००/– प्रतिवादी यांचेकडून मिळण्यासाठी दाखल केला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार त्यांनी वडीलोपार्जीत दावा मिळकतींच्या वाटपासाठी हा दावा दाखल केला आहे. प्रतिवादी क्र. १ ते ३ हे दावा मिळकतीमध्ये वहिवाट करत असून ते दावा मिळकतीमध्ये उस, हळद, सोयाबीन, भुईमूग, घेवडा अशी पीके घेतात. खर्च वजा जाता त्यांना सुमारे वार्षीक ८ ते १० लाख रुपये उत्पन्न मिळते. दाव्याचा निकाल लागण्यास बराच कालावधी लागणार आहे. प्रतिवादी हे दावा मिळकतीचे वाटप करुन देत नाहीत. सबब प्रतिवादी यांनी वादी यांना प्रत्येकी प्रती महिना रुपये १०,०००/– अंतरीम मासिक निर्वाह भत्ता देण्याबाबत आदेश व्हावा अशी त्यांनी विनंती केली आहे.

२. प्रतिवादी क्र. १ हे मयत आहेत. प्रतिवादी क्र. २ व ४ यांनी सदर अर्जास म्हणणे दिले नाही.

३. प्रतिवादी क्र. ३ हिने नि. क्र. ४७ ला म्हणणे दाखल केले आहे. तिच्या म्हणण्यानुसार दिनांक १८/०७/२०१२ इ रोजीचा दस्त प्रतिवादी क्र. १ याने कुटुंबाचे कायदेशीर गरजेकरता केला असल्याने तो वादींवर बंधनकारक आहे. प्रतिवादी क. १ ने वादी क्र. २ च्या शिक्षणसाठी तसेच कायदेशीर गरजेपोटी गट क्र. ७११ ची विक्री केली आहे. त्या खरेदी व्यवहारातील रक्कम वादी क्र. १ व २ ला वारंवार दिली आहे. या खरेदीपत्रापासून या मिळकतींमध्ये प्रतिवादी क्र. ३ चा कब्जा आहे. वादी क्र. १ चा पती मयत झाला तेव्हा त्यांच्या अंतिम विधीकरता देखील वादी हजर राहिली नाही. गट क्र. ७११ मध्ये प्रतिवादी क्र. ३ ची कायदेशीर मालकी असल्याने व तिचा कायदेशीर कब्जा असल्यामुळे वादींनी प्रतिवादी क्र. ३ कडून पोटगी मागण्याचा हक्क प्राप्त होत नाही. वादींना कायदयाने पोटगी मागता येत नाही. वादी क्र. १ हीने तिच्या पती सोबत व्यवस्थीत संसार केला नाही, तिने पती बरोबर भांडण तंटा करुन ती निघून गेली, ती सासरी नांदण्यास आली नाही, त्यामुळे तिच्या

पतीच्या मनावर भयंकर मोठा आघात झाला, तो व्यसनाच्या आहारी गेला, त्यामुळे त्याला नोकरीवरुन काढून टाकण्यात आले, तो कर्जबाजारी झाला, त्यातच तो दिनांक ३०/०६/२०१२ रोजी मयत झाला. वादी क्र. १ व २ हे मुंबईसारख्या ठिकाणी राहत होते, त्यांना त्यांचा उदरनिर्वाह करणे शक्य नव्हते. वादी क्र. २ चा शिक्षणाचा खर्च भागविणे अवघड झाले होते. प्रतिवादी क्र. १ ने कर्ज, हातउसणी रक्कम घेवून त्यांचा खर्च भागवले होते. प्रतिवादी क्र. १ ची पत्नी सुभद्रा मयत होण्यापूर्वी  बरेच दिवस आजारी होती, तिच्या औषधोपचारासाठी प्रतिवादी क्र. १ यास बराच मोठा खर्च करावा लागला. प्रतिवादी क्र. १ गेली १० वर्षे नेहमीच आजारी होते. त्यासाठी त्याला लोकांकडून हातउसने पैसे घेवून खर्च करावा लागला. प्रतिवादी क्र. १ ला सदर कर्ज व देणी भागविणे अशक्य झाले होते. तो आजारी असल्यामुळे त्याला दावा मिळकती कसता येत नव्हती. त्यामुळे त्याला उत्पन्नाचे कसलेच साधन नव्हते. त्याने वादींना गावी येवून राहून दावा मिळकतींची वहिवाट करण्यास विनंती केली आहे. मात्र वादी क्र. १ ही ऐशोआरामाचे जीवन जगणारी असलेने तिला सासरी येवून खेडयात राहून शेती करणे व कुटुंब चालविण्याची इच्छा नव्हती. म्हणून तिने सासरी येण्यास नकार दिला. वादी यांनीच सदर खर्चाची रक्कम भागविण्यासाठी वडीलार्जित मिळकतीपैकी काही मिळकतींची विक्री करण्याचा सल्ला दिला. त्यामुळे त्यांच्या सांगण्यावरुन गट क्र. ७११ ची मिळकत विक्रीस काढली परंतू त्यांचे मागणीप्रमाणे कोणीच रक्कम देवून मिळकत खरेदी घेण्यास तयार नव्हते. प्रतिवादी क्र. ३ कडे मुबलक रक्कम होती. त्यामुळे ही मिळकत दिनांक १९/०७/२०१२ रोजी प्रतिवादी क्र. ३ ला प्रतिवादी क्र. १ ने वादी यांच्या सुचनेनुसार रुपये ८,१०,०००/– खरेदी दिली आहे. त्यानंतर प्रतिवादी क्र. ३ ने ही मिळकत सुपीक बनवली आहे, आता या मिळकतीतून उत्पन्न येवू लागले आहे, वादीला त्याचा मोह सुटला आहे. या मिळकतीमध्ये वाटप मागण्याचा वादींना कसलाही हक्क नाही. हे खरेदीपत्र रद्द बातल करुन मागितले नाही. सबब अर्ज नामंजूर करावा अशी विनंती प्रस्तूत प्रतिवादीने केली आहे.

४. वादी प्रतिवादीतर्फे विद्वान विधज्ञांचा युक्तिवाद ऐकण्यात आला.

५. प्रतिवादी क्र. १ हे मयत आहेत. दावा मिळकती या प्रतिवादी २ ते ४ यांच्या वहिवाटीस आहे असे उभय पक्षकारांचे वादातीत कथनावरुन दिसून येते. वादी हे दावा मिळकत असलेल्या ठिकाणी मूळीच राहत नाहीत असे प्रतिवादींच्या कथनावरुन दिसून येते. परिणामी दावा मिळकतींचे उत्पन्न प्रतिवादी घेत आहेत हे स्पष्ट होते. वादी क्र. १ हिला उत्पन्नाचे साधन आहे असे प्रथमदर्शनी मूळीच दिसून येत नाही. दावा मिळकतीमध्ये वादी क्र. १ हिस वारसा हक्क प्राप्त झालेला आहे असे मला वाटते. तिला तिच्या हिश्याची मिळकत वाटून मिळण्यास निश्चितच बराच कालावधी लागला असे वाटते. दावा मिळकतींच्या सातबारा उतारा सदरी जमीन करणा–याचे नाव सदरी प्रस्तूत प्रतिवादींची नावे नोंद आहेत असे दिसून येते. अशा परिस्थितीत प्रतिवादी क्र. २ ते ३ हे वादी प्रतिवादी यांचे वडीलोपार्जीत मिळकतीत वहिवाट करुन उत्पन्न घेत असल्यामुळे त्यांनी वादी क्र. १ हिला अंतरीम मासिक निर्वाह भत्ता देणे आवश्यक आहे असे मला वाटते.

६. मा. मुंबई उच्च न्यायालय यांनी **सुशिलाबाई गुप्ता वि. रामचरण वैश्य व इतर मनु/एमएच/०२०६/१९७४** या न्यायनिवाडयामध्ये हिंदू एकत्र कुटुंबातील विधवा सुनेने एकत्र कुटुंबाच्या मिळकतीचा वाटपाचा दावा दाखल केल्यास व त्या मिळकतींची वहिवाट प्रतिवादी करत असतील व प्रतिवादी त्या मिळकतींचे उत्पन्न घेत असतील तर त्यांनी विधवा सुन यांना वाटपाच्या दाव्यामध्ये अंतरीम दरमहा उदरनिर्वाहभत्ता देणे बाबत दिवाणी प्रक्रिया संहिता कलम १५१ नुसार दिवाणी न्यायालयास आदेश पारीत करता येतो असे स्पष्ट केले आहे.

७. मात्र वादी क्र. १ हिला रुपये १०,०००/– इतकी रक्कम नेमक्या कोणकोणत्या खर्चासाठी आवश्यक आहे याबाबत कसलाही पुरावा सादर करण्यात आला नाही. मात्र जीवनावश्यक दैनंदीन गरजेसाठी लागणा–या वस्तूंच्या किंमती पाहता प्रतिवादी क्र. २ ते ३ यांनी तिला दावा दाखल तारखेपासून प्रती महिना रुपये

५,०००/– उदरनिर्वाहासाठी देण्याचा आदेश करणे न्यायोचित वाटते.

८. वादी क्र. २ हा सज्ञान आहे, २०१५ साली त्याचे वय २५ वर्षे होते असे दाव्यामधील कथनावरुन दिसून येते. तो निश्चितच कमवता असेल असे वाटते. मा. मुंबई उच्च न्यायालय यांनी वर संदर्भिय **सुशिलाबाई गुप्ता** या न्यायनिवाडयामध्ये एकत्र कुटुंबातील सदस्याची पत्नी, अज्ञान मुले, अविवाहीत मुली व वयोवृद्ध पालक यांच्या उदरनिर्वाहाची जबाबदारी अशा प्रतिवादींची असते असे स्पष्ट केले आहे. परिणामी वादी क्र. २ हा या सदरात बसत नाही. सबब प्रतिवादी क्र. २ ते ४ यांनी त्याच्या उदरनिर्वाहाकरीता कोणतीही रक्कम देण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही.

९. सबब प्रस्तूतचा अर्ज अंशतः मंजूर होणेस पात्र आहे असे मला वाटते. परिणामी मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे :

## <u>आदेश</u>

१. अर्ज अंशतः मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र. २ ते ३ यांनी संयुक्तिकरीत्या दावा दाखल तारखेपासून दाव्याच्या अंतिम निकालापावेतो वादी क्र. १ हिला तिच्या उदरनिर्वाहाकरीता रुपये ५,०००/– मासिक भत्ता दयावा असा आदेश पारीत करण्यात येतो.

३. वादी क्र. २ करीता हा अर्ज फेटाळण्यात येतो.

४. खर्चाबाबत आदेश नाही.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by Girish Sudarshan Mane
Date: 2019.09.26 12:24:24 +0530

स्थळ : कोरेगाव
दिनांक :२४/०९/२०१९

सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर कोरेगाव